# सामाजिक व्यक्तीमत्व

पाहिले मी सूर्याला ढगाआड रडताना रात्रीच्या एकांतात,
ढाळलेल्या अश्रूंचा दवबिंदू होउन दडताना पानाफुलात....

कुणालाच जाणीव होऊ देणार नाही तो त्याच्या दुःखाची
दवबिंदूचे काही थेंब उद्या फुलपाखरांची तहान भागवतील...

उरलेल्या अश्रूंना सुकवेल तो उद्या स्व:ताच्याच किरणांनी
जसे आपण हळूच डोळे पुसतो स्व:ताच्याच हातांनी....

महान व्यक्तींची हीच खासियत सदोदित असते
आपल्या तोट्यातूनही इतरांना नफा करुन देतात...